# चैतन्य लहरी

नोव्हेंबर / डिसेंबर २००६
अंक क्र. ११/१२



# लक्ष्मी पूजन-प्रतिष्ठान, २१ ऑक्टोबर २००६













# अनुक्रमणिका


- दिवाळी धनत्रयोदशी पूजा, प्रतिष्ठान, दिनांक १९ ऑक्टोबर २००६ ...... २
- दिवाळी लक्ष्मीपूजन पूजा, प्रतिष्ठान, दिनांक २१ ऑक्टोबर २००६ ...... २
- दिवाळी पूजा, निर्मलनगरी, खाटपेवाडी पुणे (वृत्तांत) ...... ३
- म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, पुणे, दिनांक २८ नोव्हेंबर २००६ ...... ४
- स्त्रियांची भूमिका,.पू.श्रीमाताजींनी केलेला उपदेश ...... ५
- श्रीदेवी भागवत,स्कंध सातवा ...... ९
- आदर्श सहजयोगीनी होण्यासाठी खालील गोष्टी अंगीकारणे आवश्यक आहे. ...... ११
- श्रीमाताजींचे मार्गदर्शन ...... १६
- वर्गणी फॉर्म-२००७ ...... १९


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था '' **निर्मल ट्रान्फॉरमेशन प्रा.लि.पुणे**'' या कंपनी मार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,**निर्मल ट्रान्फॉरमेशन प्रा.लि.पुणे**.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ व २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

KOTHRUD,PUNE 411 O38. TEL. 020 25286537

## नवीन वर्षाच्या शुभेच्छा

# दिवाळी धनत्रयोदशी पूजा, प्रतिष्ठान

## दिनांक १९ ऑक्टोबर २००६

श्रीमाताजींच्या शयनकक्षामध्ये श्रीमाताजींची धनत्रयोदशी निमित्त पूजा आयोजित केली होती. साधारण १०.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या शयनकक्षेत उपस्थितांनी प्रवेश केला. कोचावर श्रीमाताजी व त्यांच्या सोबत श्री पापाजी हे शयनकक्षामध्ये बसले होते. त्यांच्यासमोर मोठ्या पदकात लाल रंगाच्या पणत्या प्रज्वलित करून ठेवल्या होत्या. सुरवातीला श्रीमाताजींच्या चरणावर श्री आनंदभैया व श्री पुगालिया यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर एका सुंदर तबकात ठेवलेली चांदीची नाणी श्रीमाताजींना अर्पण करण्यात आली . त्यावेळी श्रीमाताजींनी विचारले की, ''तबकात एकूण किती नाणी आहेत?'' त्यांना सांगितले की एकूण ५१ नाणी आहेत. त्यानंतर श्री आगरवाल दिल्ली यांनी श्रीमाताजींना सोन्याचा गणेश अर्पण केला. त्यावेळी श्रीमाताजींनी हिंदीत विचारले की, ''कहाँ लगावू ?'' आणि त्यांनी सदर गणेश कपाळाला लावून व्हायब्रेट केला.

श्रीमाताजींना प्रसाद अर्पण करण्यात आला. त्यावेळी श्रीपापाजींनी श्रीमाताजींना आपल्या हाताने दिवाळीच्या करंज्या भरवल्या. त्यावेळी श्रीमाताजींनी त्यांचे नातू श्री आनंदभैया यांना प्रसाद द्या असे म्हणाल्या. त्यानंतर सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. त्यावेळी श्रीमाताजीं व श्रीपापाजींना भेट वस्तू अर्पण करण्यात आल्या. त्यानंतर श्रीमाताजींसोबत ग्रुप फोटो काढण्यात आले. त्यावेळी श्रीमाताजी अतिषय आनंदी दिसत होत्या. शेवटी ऑस्ट्रेलियाचे डॉ श्री बोगडम यांनी श्रीमाताजींना एक पुष्पगुच्छ अर्पण केला. सदर कार्यक्रम संपला त्यावेळी अंदाजे १०.५० झाले होते.

● ● ●

# दिवाळी लक्ष्मीपूजन पूजा

## प्रतिष्ठान, दिनांक २१ ऑक्टोबर २००६

दिवाळी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये छोटीशी पूजा आयोजित केली होती. साधारण संध्याकाळी ५.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये आगमन झाले. त्यांच्यासोबत श्री पापाजी होते. सुरूवातीला श्रीमाताजींना हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींना दिवाळी शुभेच्छा कार्ड व श्री पापाजींना दिवाळी शुभेच्छा कार्ड दिले. त्यावेळी श्रीमाताजींना शुभेच्छा कार्ड खूपच आवडल्याचे जाणवत होते. त्यानंतर श्री आगरवाल व श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींना एक साधारण ९-१० फूट लांब व ३.५ ते ४ फूट रुंद असा फोटो अर्पण केला. त्यामध्ये श्रीमाताजींचे मागील २५-३० वर्षातील अनेक वेगवेगळे प्रसंग असलेले फोटो होते. त्यानंतर फ्रेंच कलेक्टीव्हीटीच्या वतीने श्रीमाताजींना एक हिरा बसविलेली अंगठी व अत्तर अर्पण केले. त्यांच्या उजव्या हाताच्या बोटामध्ये अंगठी घालण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींना एक नेकलेस अर्पण करण्यात आला तो त्यांच्या गळ्यात घालण्यात आला.

त्यानंतर श्रीमाताजींना उपस्थित महिलांनी ओटीचे साहित्य असलेले तबक व प्रसादाचे साहित्य असलेले तबक अर्पण करण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींची आरती करण्यात आली. उपस्थितांना प्रसाद वाटण्यात आला. सदर पूजेचा कार्यक्रम साधारण ६.०० च्या सुमारास संपला.

● ● ●



# दिवाळी पूजा

निर्मलनगरी, खाटपेवाडी पुणे (वृत्तांत)

२१,२२ आक्टोबर २००६

श्रीमाताजींचे पुण्यातील निवासस्थान प्रतिष्ठान पासून जवळच असलेल्या परंतु अतिशय निसर्गरम्य असलेल्या अशा आपल्या स्वत:च्या जागेत दिवाळी पूजेचे आयोजन केले होते. साधारण २०आक्टोबर २००६ पासूनच सहजयोग्यांचे आगमन सुरु झाले होते.

दिनांक २१ ऑक्टोबर २००६ रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास मुख्य कार्यक्रमाची सूरवात झाली. कार्यक्रमाच्या सुरुवात तीन महामंत्रांनी पुणे म्युझिक ग्रुपने केली. त्यानंतर स्वागत गीत झाले. त्यांनी त्यावेळी

'नजर मे मेरी तू' ही कव्वाली सादर केली. त्यानंतर डॉ राजेश यांनी, ' निर्मल माँ निर्मल माँ' हे भजन सादर केले.

नागपूर ॲकडमीचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी सुरुवातीला व्हायोलिनवर श्री धाकडे गुरुजी व सितारवर श्री अरविंद शिवोलीकर यांची जुगलबंदी सादर केली. त्यांना तबल्याला साथ संदेश भोपटकर यांनी दिली. त्यानंतर छाया व आकांक्षा यांनी, ''लाख पढलो किताबे नही होगा कुछ असर'' ही कव्वाली सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली.

त्यानंतर एन.जी.ओ.च्या ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला 'तेरी वंदना करते है हम', ' माँ भक्तो की रखवाली मेरा सहारा तुम ही हो' शेवटी मराठी नवीन जोगवा, 'दे बाई दे जोगवा दे' सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली.

साधारण ८.३० च्या सुमारार श्री अजित कडकडे आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला राग, ' गोरक कल्याण' सादर केला. त्यानंतर 'माता दर्शन दे दे', 'मेरे मन में श्री माँ', 'देवाचा देव बाई ठकडा ', कार्यक्रमाचा शेवट 'श्री माताजी मेरे मन में' ह्या भजनाने केली.

त्यानंतर साधारण १०.०० च्या सुमारास सहजयोगात प्रथमच लहान मुलांच्या गाण्याची स्पर्धा परीक्षक श्री आनंद भैया आणि सहकाऱ्यांच्या समोर सादर केली. त्यात स्पर्धक कु. चारुश्री शर्मा हिने, 'आओ आओ मेरे धरमा',कु.कृती गोयल हिने, 'वंदना वंदना सब करो वंदना', कु. वलई आलाखान हिने, 'जागो हे जगदंबे' ,कु. गिरिजा दिवेकर हिने 'माँ निर्मल भोली भाली ', कु. नित्य युनिव्हर्स हिने, 'घणे घणे जंगलवाली', कु.जुही जोशी ने, 'या महोम्मद', कु.इंद्रा दुजानी ने ' जय गणपति वंदन',कु. कृतीका दले ने 'आज भी कैलाश में', कु सुरभि लोंडे ने 'तुम आशा विश्वास हमारी', कु.अंकिता शिंदे ने 'वंदन करते' ही सहजयोगातील भजने सादर करुन सर्वांना चकित केले. त्यावेळी तिघांची उत्कृष्ट म्हणून निवड करुन सर्वांना बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर निर्मलनगरीच्या तयारीसाठी ज्यांनी कामे केली त्यांपैकी श्री प्रवीण जावळकर, श्री जाधव, श्री निमण यांचा सत्कार श्री आनंदभैया यांच्या हस्ते करण्यात आला.

त्यानंतर सहजयोगी कलाकारांचे कार्यक्रम सरु झाले. त्यात अमरावतीच्या कलाकारांनी, 'हासत आली',मुंबई म्युझिक ग्रुपने सुरुवातीला लक्ष्मी वंदना हे भरतनाट्य सादर केले. त्यानंतर कव्वाली, 'दाता तेरे दरबार में' सादर केली. गजियाबादच्या कु. वंदनाने 'ए गिरी नंदिनी' सादर केले. पुणे बालशक्तीने दांडिया सादर केला. साधारण १२.४५ च्या सुमारास कार्यक्रम संपला. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री पराग राजे यांनी अतिशय सुंदर केले.

दिनांक २२ आक्टोबर २००६

आजचा दिवाळी पूजेचा दिवस. सर्व सहजयोगी सकाळपासूनच पूजेसाठी तयारीला लागले होते. श्रीमाताजी संध्याकाळी ५.०० वा पूजेसाठी येणार अशी अनाऊंसमेंट झाली असल्याने सर्वजण दुपारपासूनच मुख्य पेंडॉलजवळ बसू लागले होते. श्रीमाताजींच्या येण्याच्या रस्त्यावर दुतर्फी हातात पंचारती घेऊन पांढऱ्या साड्या नेसलेल्या महिला व पांढरे कपडे घातलेले पुरुष दुतर्फा उभे होते. श्रीमाताजींचे ५.३० च्या सुमारास निर्मलनगरीमध्ये आगमन झाले. त्यांच्यासोबत श्री पापाजी, कल्पनादीदी, श्री आनंदभैया होते. सर्वांना श्रीमाताजींसाठी तयार केलेल्या विश्रांती कक्षेत नेले. त्याठिकाणी श्रीमाताजी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी चहापान घेतले. त्यानंतर साधारण १५ मिनिटांनी श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी सर्वजण उभे राहून स्वागत-आगत हे गीत म्हणत होते. सुरुवातीला श्रीमाताजींना दोन सुवासिनींनी ओवाळले.त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला.

त्यावेळी श्री पापाजींनी सर्वांना मार्गदर्शनपर छोटेसे भाषण केले. त्यानंतर पूजेला सुरवात झाली. त्यावेळी लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले वाहिली. त्यावेळी गणपतीअथर्वशीर्ष व नंतर जागो सबेरा आया है , महामाया महाकाली, श्री लक्ष्मी अष्टकमलम ही पूजेतील भजने झाली.

त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणांची कल्पनादीदी कुंकवाने पूजा करीत होत्या. त्यानंतर श्रीमाताजींना पायातील,हातातील, गळ्यातील देवींची अभूषणे घातली. त्यानंतर श्रीमाताजींच्या डोक्यावर मुकुट ठेवण्यात आला.पूजा झाल्यानंतर सुवासिनींनी ओटी भरली. त्यानंतर श्रीमाताजींची आरती केली. आरतीनंतर श्रीमाताजींना जगभरातून आलेल्या सहजयोग्यांनी प्रेझेंट अर्पण केली. आणि आदिशक्ती सर्वांना आशिर्वादित करुन परत आपल्या निवासस्थानी निघाल्या त्यावेळी सुमारे ७.०० वाजले होते.

त्यानंतर सर्वांनी प्रसाद घेतला. दिवाळी पूजा २००६चे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या स्वत:च्या जागेत एक महिन्यापेक्षा कमी वेळात पूजेची तयारी केली होती. सदर आपल्या जागेत अतिशय कमी वेळात सर्व तातडीच्या सुखसोयींनी तयारी ही केवळ श्रीमाताजींच्या कृपाशीर्वादानेच पूर्ण झाली. श्रीमाताजी निवासस्थानी गेल्यानंतर साधारण १० -१५ मिनिटे हलकासा पाऊस पडला. त्यावेळी वरुणराजाने सदर पूजेमध्ये आपली उपस्थिती दाखवल्याचे सर्वत्र सहजयोगी चर्चा करीत होते.

● ● ●

## म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, पुणे

### दिनांक २८ नोव्हेंबर २००६

प्रतिष्ठानमध्ये एन.आय.टी.एल. कंपनीतर्फे म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये कार्यक्रमाची व्यवस्था केली होती. श्रीमाताजींचे रात्री ८.०० च्या सुमारास हॉलमध्ये आगमन झाले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर एन.आय.टी.एल.चे श्री मुनिश पांडे यांनी हार आर्पण केला. त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. आजच्या कार्यक्रमासाठी सहजयोगी गायक श्री सिंपल यांना आमंत्रित केले होते. त्यांनी सुरुवातीला, ''जिसमे सुरत श्री माकी ना आये नजर अब मुझे ऐसा दर्पण नही चाहिये '' हे भजन म्हटले. त्या भजनाचे श्री पापाजींनी फार कौतुक केले. त्यानंतर त्यांनी आणखी एक भजन सादर केले.

त्यानंतर एन.आय.टी.एल. कंपनीच्या वतीने कंपनीच्या चेअरपर्सन म्हणून श्रीमाताजींना व व्हाईस चेअरमन म्हणून श्री पापाजींना फुलांचा गुच्छ कंपनीच्या वतीने देण्यात आला. त्यानंतर नवीन डि.व्ही.डी.चे उद्घाटन श्रीमाताजींच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी श्रीमाताजींनी सर्वांना आशीर्वाद दिला.



## स्त्रियांची भूमिका

### प.पू.श्रीमाताजींनी केलेला उपदेश

आपल्याला हे समजले पाहिजे की, इतिहासांतील हा एक अत्यंत मोलाचा क्षण आहे की आपण प्रत्यक्ष जन्माला आलो आहोत आणि परमेश्वरी कार्य करत आहोत. त्यासाठीच तुमची निवड झाली असून तुम्ही संत आहात हे तुम्ही जाणले पाहिजे, म्हणून तुम्ही कोणत्याही निरर्थक व क्षुल्लक गोष्टीमुळे दबून जाता उपयोगी नाही. जो योगी आहे त्याला 'वसुधैव कुटुम्बकम्' वाटले पाहिजे.

परंतु असे दिसते की, पुष्कळ स्त्रिया ह्या फार मोठ्या प्रमाणावर अधिकार गाजवितात. आता मात्र सर्व स्त्रियांना ताकीद द्यावीशी वाटते की त्यांनी योग्य तऱ्हेने वागले पाहिजे. आपण ''पत्नी'' आहोत याचा विसर पडू देता उपयोगी नाही. जर त्या योग्य प्रकारे वागणार नाहीत तर सहजयोगामुळे मिळालेले त्यांचे सर्व कृपाशीर्वाद काढून घेतले जातील. त्यांना सर्व दुखां:ना तोंड द्यावे लागेल. त्यावेळी त्यांनी मला दोष देऊ नये कारण हे सर्व एकादश रुद्रामुळे घडणार आहे. ज्या स्त्रिया आक्रमक वृत्तीच्या आहेत त्यांच्या लक्षात हा मुद्दा येत नाही. त्यांना ''मी'' कोण आहे ते ठाऊक नाही आणि त्यांना स्वत:चीही किंमत कळत नाही. स्त्रियांनी हे समजले पाहिजे की त्या ''स्त्रिया'' आहेत कारण त्या कनवाळू व सोशिक आहेत खरं म्हणजे त्या पृथ्वीमातेप्रमाणे आहेत.

म्हणून मला अग्रहाने प्रथमत: एक विनंती करावीशी वाटते की, सर्व सहजयोगींना प्रथम सहजयोग, जसा पुरुषांना समजतो तसा समजला पाहिजे. त्या पूर्णत: तरबेज असल्या पाहिजेत. त्यांची प्रकृती ठणठणीत असायला हवी व सहजयोगाचे संपूर्ण ज्ञान त्यांना असायला हवे. सहजयोग म्हणजे खरे काय ते त्यांनी शोधून काढायला हवे. तुमची गुरु एक स्त्री आहे. ती सर्व ज्ञानाचा उगम आहे. ती सर्व ज्ञानाचा सागर आहे मग तुम्ही का माघार घ्यायची? प्रत्येकीला सहजयोग बुद्धीने व भावनेने समजला पाहिजे. मी तुम्हाला विनंती करते कारण तुम्ही ''शक्ती'' आहात. पुरुषाच्या पाठीमागे असणारी शक्ती तुम्ही आहात. तुम्हीच त्यांना थोर बनविणार आहात. तुम्हीच सहजयोगाची त्यांची ऊर्जा शक्ती आहात व तुम्हीच सहजयोग घटित करणार आहात. ज्याप्रमाणे या पृथ्वीमातेला सर्व सुंदर फुले वगैरे सर्व सुंदर वस्तू द्याव्या लागतात त्याप्रमाणे तुम्हीही आहात. पृथ्वीमाता कशी साधी सुधी दिसते पण ती काय देत नाही? तिकडे लक्ष असू द्या.

म्हणून प्रत्येकीला हे कळले पाहिजे की उत्तम सहजयोगिनी म्हणजे उत्कृष्ट पत्नी तुम्हाला हे समजले पाहिजे की तुम्ही सर्व जगाच्या भावना, इच्छा आकांक्षा आहात. इतक्या तुम्ही महत्त्वाच्या आहात. तुमच्याशिवाय कोणत्याच गोष्टीची सुरुवात होऊ शकत नाही. जर मी श्रीसदाशिवांपासून श्रीगणेशांपर्यंत सर्वांना एकत्र आणले नसते व या भूतलावर अवतार घेतला नसता तर त्यांना काहीच करता आले नसते. ही सत्य गोष्ट आहे. एक स्त्री म्हणून, आई म्हणून, पत्नी म्हणून व प्रेयसी म्हणून मी हे सर्व प्राप्त केले आहे आणि तेच तुम्हालाही करावयाचे आहे. ही गोष्ट इतकी सहज व सोपी आहे कारण मी एक स्त्री आहे आणि स्त्री म्हणून मी जगले आणि म्हणूनच जगातील इतक्या सर्व मुलांना मी

सांभाळले. जगाचे हे नाटक मी योग्यप्रकारे सांभाळले. त्याबरोबर माझे कुटुंबही मी योग्य सांभाळले. मी योग्य संतुलन ठेवले आणि आता तुम्ही पहाता की स्त्री ही केवळ धर्म गुरु न राहता सर्वश्रेष्ठ ''गुरुणाम् गुरु'' असू शकता.

आता मला तुम्हाला सर्वांना सांगायचे आहे की तुम्ही पुढे आले पाहिजे. आपल्या ''सहजाकडे'' लक्ष दिले पाहिजे. तुम्ही अत्यंत महत्त्वाच्या आहात कारण दुराचारी स्त्री व दुर्वर्तनी पत्नी ही कोणत्याही वाईट पुरुषापेक्षा अधिक नुकसान व घात करते.

मी स्त्री आहे याचा मला अभिमान आहे व मला कदापीही पुरुष होण्याचा तिरस्कारच वाटला असता. श्रीकृष्णाकडे पहा. त्याला सोळा सहस्र बायका होत्या. त्यांना तो शिष्या म्हणून स्वीकारू शकत नव्हता. त्या सर्व '' शक्ती'' होत्या व श्रीकृष्णाच्या शक्ती असल्यामुळे त्यांना त्याच्या बायका म्हणून रहावे लागले. आजही सर्वजण श्रीकृष्णाला ''गोपीकृष्ण''(अनेक स्त्रियांचा पती)म्हणूनच ओळखतात पण मला असे कुणीच म्हणू शकणार नाही कार ण मी '' स्त्री '' आहे. आईला कुणी आव्हान देऊ शकत नाही. परंतु वडिलांना सर्वजण आव्हान देतात.

'' स्त्री '' म्हणून तुम्ही अनेक गोष्टी मिळवू शकता त्यासाठी तुम्हाला काही गोष्टी ठाऊक असणे जरुरीचे आहे. आपले दुसऱ्यावरील शुद्ध प्रेम त्यांच्यापर्यंत कसे पोहोचवायचे, दुसऱ्या बद्दल वाटणारा जिव्हाळा त्यांना कसा दाखवायचा, आपल्या पतीला सहजयोगात कशी मदत करावयाची इत्यादी.

सहजयोग विवाहाच्या वेळीच तुम्ही मला वचन दिले होते की तुम्ही सहजयोगासाठीच काम कराल. इतर सहजयोग्यांची काळजी घ्याल. आपले घर म्हणजे एक सहजयोगकेंद्र असेच समजाल व इतर सहजयोग्यांचे आपल्या घरी स्वागत कराल व सामूहिकता वाढीला लावाल व तसा प्रयत्न सदैव कराल. म्हणून ''स्त्री'' म्हणूनच रहा. स्त्रीत्वाचा अभिमान असू द्या म्हणजेच सर्वासाठी अतिशय सुंदर विश्व आपण निर्माण करु शकू.

जगाच्या महत्त्वाच्या प्रश्नांपैकी ''राजकारण'' हा एक प्रमुख प्रश्न असून एक ना एक दिवस ज्यावेळी सुयोग्य वेळ येईल त्यावेळेस आपल्याला सर्वांनाच राजकारणात उतरावे लागणार आहे. आपण त्यासंबंधीचा संपूर्ण आराखडा , भारदस्त पद्धतीने तयार



करु पण त्यापूर्वी तुम्ही हे दाखविले पहिजे की तुम्ही अत्यंत संतुलित व चांगली कुटुंबे आहात.

तुम्ही आपल्या मुलांना ''कसे वागावयाचे'' हे शिकवले पाहिजे. ज्याप्रमाणे आपल्याला समाज व कुटुंब यांना योग्य वळण, योग्य समज व योग्य दिशा द्यावयाची आहे. त्याप्रमाणे आपल्याला आपल्या मुलांनाही योग्य वागणुकीचे प्रशिक्षण द्यायला हवे.'लालयेत्प वर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् । प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्।।'

जणु तुम्ही पहिल्या दोन पायऱ्या विसरलात तर तुम्ही आपल्या मुलांना योग्य पद्धतीने कधीच वागवू शकणार नाही. स्त्रियांनी अत्यंत सतर्क राहिले पाहिजेव आपल्यामधील नकारात्मक शक्तींना आपण कधीच बळी पडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यांनी अत्यंत विनयशील, अत्यंत लाघवी व नि:स्वार्थी असले पाहिजे कारण, त्यांच्यामध्येच ही शक्ती आहे. फक्त स्त्रिया आणि स्त्रियाच हे करू शकतात. पुरुष कदापिही नाही त्यांचे मार्दव इतरत्र असते. पुरुष हे करू शकत नाहीत. पण संपूर्ण विश्व हे सुंदर व विलोभनीय करण्याचे बुद्धीचे कौशल्य फक्त स्त्रियांमध्येच असते.

आपले विचार केवळ डावीकडचे किंवा केवळ उजवीकडे असतील तर आपण विचारांबद्दल अतिरेक व्हाल व प्रश्नांचा उलगडा होण्याऐवजी प्रश्न अधिक गुंतागुंतीचे कराल म्हणून आपण सर्वांनाच मध्यमार्गी ठेवले पाहिजे आणि मध्यमार्गात ठेवण्यासाठी आपले उत्थान झाले असले पाहिजे.

तुम्ही यासाठी थोर संत व अवतार यांचे उदाहरण द्या. प्रत्येक थोर अवताराने जे सांगितले, या सर्वांचा जो मूळ मतितार्थ व गाभा होता त्याचा त्यांच्या शिष्यांनी चोथा केला. कारण ते सर्व शिष्य अनधिकृत होते त्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला नव्हता.

आता माझ्यापुढील सर्वांत गहन प्रश्न हा आहे की स्त्रिया ज्या माझ्या शिष्या आहेत त्या सहजयोग बिघडवणार काय? होय आता मला ते अगदी स्वच्छ व स्पष्ट दिसत आहे. याच सहजयोगात बिघाड निर्माण करणार कारण त्या दुसऱ्यांवर अत्यंत अधिकार गाजविणाऱ्या आहेत. आणि त्या स्वत:ला खूप शहाण्या व मोठ्या चांगल्या असे मानतात. आणि हो त्या स्वत:च पुढारी आहेत असे समजते. तिला असे वाटते की माताजींपेक्षा तिचा तिच्या नवऱ्यावर अधिक अधिकार आहे. आज, अशा स्त्रिया खऱ्या गुन्हेगार आहेत. म्हणून मी तुम्हाला ताकीद देत आहे.

मला पुन्हा तुम्हाला विनंती करायची आहे की, तुम्ही हे समजले पाहिजे की ही सर्व जबाबदारी तुमच्याच खांद्यावर राहील. मंथरा आणि कैकयीसारख्या स्त्रियांचे उदाहरण आठवा. आज त्यांचे नावसुद्धा लोकांना नकोसे वाटते. जर इतिहासात तुमचे नाव तशा पद्धतीने यावे असे तुम्हाला वाटत असेल तर गोष्ट अलाहिंदा! पण मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगते की, तुम्ही सध्या अत्यंत निर्वाणीच्या काळातून जात आहात. म्हणून स्वत:बद्दल खूप खूप काळजी घ्या. मी सद्य: क्षणाबद्दल व सद्य: कालाबद्दल कृती करत असते पण तुम्ही स्वत:चे आत्मपरीक्षण करून पुढे काय होईल व काय करावे याचा निर्णय घ्यायचा आहे.

मला विशेषकरून एक अत्यंत महत्त्वाची सूचना सर्व स्त्रियांना करावयाची आहे की, सद्य:स्थितीत त्या आणि त्याच फक्त जगाला वाचवू शकतील. पुरुष नक्कीच नाही. त्यांनी आपले कार्य यापूर्वीच केले आहे. आता तुम्हाला आपल्या सारासार बुद्धीने, कनवाळूपणाने त्यागाने, विवेकाने आणि तुमच्या शुद्ध प्रेमाने केवळ तुमच्या मुलांनाच



नव्हे तर तुमच्या पतींना तुमच्या कुटुंबांना इतकेच काय, संपूर्ण विश्वाला सांभाळायचे आहे. ही एक अपूर्व संधी तुम्हाला सर्वांना मिळाली आहे व त्या संधीचे तुम्ही सोने केले पाहिजे. तुमच्यापैकी काही जणींना सदैव कृपाशीर्वाद मिळाले आहेत. त्यामुळे त्या माझ्याकडे येतात याची जाणीव मला तत्परतेने होते. संपूर्ण वातावरण त्यांच्या आगमनाची वाट पहात असते. अशा स्त्रिया तुमच्यात आहेत व त्यांना तुम्ही आपला आदर्श मानला पाहिजे. मूर्ख, निरर्थक व निष्फळ स्त्रियांना नव्हे.

आपला आदर्शांचाच कित्ता गिरवा. हेच मला तुम्हाला सांगावयाचे आहे. तुमच्यात फार मोठी सुप्त शक्ती आहे. सहजयोगाला घराच्या किंवा कुटुंबाच्या मर्यादा नाहीत. तुमच्या केवळ एक स्पर्शाचे ते काम आहे. खरा आपला प्रश्न हा आहे की स्त्रियांनी आपली मूल्ये गमवली आहेत. त्यांच्या हृदयाच्या खोलीचा त्यांना विसर पडला आहे. त्या जास्तीत जास्त स्पर्धात्मक वृत्तीच्या, पैसा हेच विश्व मानणाऱ्या, यशाने फुगून जाणाऱ्या आणखी काय काय होत असलेल्या आहेत. त्यांना सहजयोगाबद्दल ओढ नाही. म्हणून तुम्हाला खूप काळजीपूर्वक राहिले पाहिजे. सर्व सहजयोगिनींना मला सांगावेसे वाटते की, हा मूळ प्रश्न अत्यंत

महत्त्वाचा असून तुम्ही त्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. स्त्री ही स्वर्गाकडे नेणारी शिडी होऊ शकते. त्याचप्रमाणे नरकाकडे ओढणारी घसरगुंडीही असू शकते. स्त्रियांनी आता शिवाय व विनयशीलतेशिवाय असणारी स्त्री ही स्त्री असू शकत नाही. ममता हाच तिचा गौरव. मला ठाऊक आहे की, एकदा का स्त्रियांना आपली शक्ती कळली तर त्या हे संपूर्ण विश्व सुंदर करतील. परंतु पुरुषांच्या धर्तीवर जाण्याचा अटटाहास हाच त्यांचा कमकुवतपणा आहे.

काही पुरुष मला, आत्मपरीक्षण करून आणि स्वत:पुढील प्रश्न अचूकपणे हेरून सांगतात की, ''माताजी माझ्या पत्नीमुळे मी सहजयोगात आलो''. अशांना स्त्रियांबद्दल अतिशय आदर असतो. मूलत: भारतांतील स्त्रियांचा दृष्टिकोन वेगळा आहे. तिला आपल्या कुटुंबात धर्म प्रस्थापित करावयाचा असतो व ईश्वरी सौंदर्य कुटुंबात न्यावयाचे असते. तिला आपल्या मुलांना सर्व चांगल्या गोष्टी द्यायच्या असतात. सर्व भारदस्त गोष्टीही त्यांना द्यायच्या असतात.तिला विनयशील असे असणे क्रमप्राप्तच आहे. तिला आपला आवाज वाढवून चालणार नाही. जर तिने आवाज चढवला तर ती मुलांना बिघडवील. एकप्रकारे ती मुलांना, आवाज कसा वाढवावा हे शिकवेल. मुलांनी आपली आज्ञा पाळावी असे वाटत असेल तर तिने आपल्या नवऱ्याचे आज्ञापालन केले पाहिजे. त्याचा उपयोग होतो. स्त्रिया ह्या भावनाप्रधान असतात. त्या अत्यंत हुषारीने व धूर्तपणे हे काम करून घेतात.

तुम्ही सर्वजणी माझ्यासारख्या होऊ शकता. पुरुषांना जे मिळवता येणार नाही ते सर्व वा माझ्या सर्व शक्ती तुम्ही मिळवू शकता. परंतु तशी तुमची इच्छा असायला हवी. क्षुल्लक तोकड्या दृष्टीचा व स्वत:चे माहात्म्य वाढविणाऱ्या तुम्हाला आपल्या क्षुल्लक कल्पनांचा त्याग करायला हवा. मला खात्री आहे की जर तुम्ही मनाशी खूणगाठ बांधली की जे माताजी करतात ते सर्व आम्ही करू शकू तर हे नक्कीच घडू शकेल. आपल्या कार्याच्या या युक्त्या आहेत. साक्षी स्वरूपात आपल्या नवऱ्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. तो संपूर्ण वाढलेला एक मुलगाच आहे असे समजा व त्याची देखभाल करा. दयाळूपणे त्याच्याकडे संपूर्ण लक्ष द्या. निश्चितच आपण एक आदर्श जाती,आदर्श कुटुंब व सर्वत्र आदर्श निर्माण करत आहोत हे संपूर्ण विश्वाला आपण दाखवू शकू.

लोकांनी जरी आपल्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तरी आपण त्याबद्दल काहीच विचार करणार नाही. आपल्याला पुढे आणि पुढेच जावयाचे आहे. सहजयोगातील स्त्रियांनी हे करावयाचे आहे. आपल्या पुरुषांना ही शक्ती स्त्रियांनीच कशी देता येईल ते पहायचे आहे.

मला ठाऊक आहे की जर पुरुष कमकुवत असेल तर त्यांची पत्नी त्याला सदैव त्रास देणारी असेल व पुरुष जर बलवान असेल तर त्याच्या मागे स्त्रीची शक्ती असेल. वीज प्रकाश व दिवा यांच्याप्रमाणेच हे चालते. जर वीज योग्य प्रकारे वाहत असेल तरच दिवा जळू शकेल. आईला मूल बळकट करावयाचे आहे व तुम्ही सर्वजणी सर्व झाडांची मुळे आहात. तुम्हाला त्यांचे योग्य प्रकारे पोषण करावयाचे आहे म्हणून तुम्ही सर्व सहजयोग्यांशी आईच्या व बहिणीच्या प्रेमाने वागले पाहिजे. त्यांच्याशी भांडता उपयोगी नाही व कडक शब्दात बोलताही उपयोगी नाही हा काही स्त्रियांचा धर्म नाही. त्यांनी शांत राहून वादविवाद न करता जे होईल ते नीट पाहिले पाहिजे.

जरी त्यांच्या काही चक्रांवर त्यांना ताण जाणवत असल्या तरी त्यांनी ती चक्रे स्वच्छ केली पाहिजेत. पत्नीना या दृष्टीने त्यांना ती गुप्तपणे स्वच्छ करता येतील. तुम्हीच ते करू शकता. जरी हा प्रश्न अत्यंत भयानक धक्का देणारा आणि घातक वाटत असला तरी त्या प्रश्नाच्या किल्ल्या आजच्या स्त्रियांच्या हातात आहेत. जर त्यांनी स्वत:ची प्रगती केली व स्वतंच्या थोरपणाचे योग्य आकलन केले तर त्या हा प्रश्न चुटकीसारखा सोडवू शकतात. त्यांनी स्वत:ला सवंग मात्र निश्चित अशा स्त्रोताची जाणीव जर मी तुमच्यात निर्माण करू शकले व तदनंतर तुम्ही त्या मोठया प्रश्नाचे मूळ स्वरूप समजून घेऊन त्या स्त्रोताचे नियमन करू शकला तर माझी खात्री आहे की आपण सर्वजणी सहजयोगाचे योग्य व्यवस्थापन करु शकू आणि शेवटी मानवतेचे संपूर्ण संरक्षण करू शकू कारण ती तुमची शुद्ध इच्छा आहे.

• • •

# श्रीदेवी भागवत

## स्कंध सातवा

हिमालयाने हात जोडून देवीस विचारले, ''हे देवी, मी कोणते अनुष्ठान करू म्हणजे मी तत्त्वदर्शनास योग्य व समर्थ होईन? हे महेश्वरी, तत्त्वदर्शनासाठी योग्य असा आत्मज्ञान देणारा योग मला सांग.''

देवीला हिमालयाच्या उत्सुकतेमुळे आनंद झाला. ती म्हणाली,

''पर्वतश्रेष्ठा, तत्त्वदर्शनाचा योग हा कुठेही उपलब्ध नाही. तो स्वर्गावर नाही, भूलोकी नाहीआणि रसातलातही आढळणार नाही. तर योग म्हणजे दुसरे तिसरे साधन नसून जीवात्मा व परमात्मा याचे ऐक्य करता येणे हाच तो योग होय. योगात निपुण असलेले योगिजन असेच सांगतात.''

सर्व वृत्तींपासून परावृत्त होऊन निर्मल व चैतन्यामध्येच स्थिर राहणाऱ्या अंत:करणाने त्याच ठिकाणी आपल्याला अत्यंत प्रिय अश्या देवतेचे चिंतन करावे. त्या एकाग्र चिंतनालाच या शास्त्रात ध्यान म्हणतात.

हे पर्वता, जीवात्मा व परमात्मा यांच्या ऐक्याविषयी मनात सतत जी भावना योगी स्थिर करतो तिलाच मुनिजन समाधी असे संबोधतात.

हे शरीर म्हणजे ब्रह्मांडच आहे. मनात दृढ विचार धरावा. कारण हे शरीर पंचमहाभूतांपासून निर्माण झाले आहे. चंद्र, सूर्य, अग्नि इत्यादींनी ते युक्त आहे व ते जीवब्रह्माशी एक आहे, म्हणून ते त्यांच्याशी एकरूपच आहे.

शास्त्रात सांगितल्याप्रमाणे या शरीरात साडेतीन कोटी नाड्या संभवतात. त्यात दहा नाड्या प्रमुख आहेत. त्या दहा नाड्यात वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाच्या तीन नाड्या आहेत. त्यांची एक विशिष्ट प्रकारची व्यवस्था आहे. या तीन नाड्यांपैकी सुषुम्ना नावाची नाडी ही सर्वात प्रमुख नाडी आहे. ती य सर्व शरीराच्या पृष्ठभागी आहे. म्हणजे मेरुदंड म्हणून ज्याला संबोधतात त्या पाठीच्या कण्यात ती सुषुम्ना नाडी आहे. ती चंद्र, सूर्य व अग्निरूपाने युक्त आहे.

डाव्या बाजूस इडा या नावाची नाडी आहे. ती चंद्ररूपाप्रमाणे आहे. तसेच उजव्या बाजूस पिंगला या नावाची नाडी आहे. ती सूर्याप्रमाणे सतेज, शक्तिस्वरूपाची व साक्षात् अमृतात्मक आहे.

अग्नीसारखी दैदीप्यमान भासणारी जी सुषुम्ना नाडी आहे ती सर्व तेजांनी युक्त आहे. हे पर्वतश्रेष्ठा, त्या मायाबीजावर दिव्याच्या ज्योतीप्रमाणे लालसर आकृतीची कुंडलिनी आहे. तीच देवीरूप आहे असे म्हणतात. ती ज्योतीच्या आकाराची कुंडलिनी माझ्यापासून वेगळी नाही. ती माझेच रूपात विलीन झालेली आहे.

तिच्या बाहेरच्या बाजूला सुवर्णाप्रमाणे भासणारे असे लालसर रंगाचे व,श,ष,स या चार वर्णांनी युक्त असलेले चार दलांचे व कढवलेल्या सुवर्णाप्रमाणे अत्यंत तेजस्वी असे कमल आहे. त्या कमलाचे नित्य चिंतन करावे.

या कमलावर अग्नीप्रमाणे व उज्ज्वल अशा हिऱ्याप्रमाणे असलेल्या वर्णाचे सहा दलांचे एक कमल असते. त्याच्याही वरच्या बाजूस म्हणजे नाभि कमलाच्या प्रदेशात मणिपूर नावाचे अत्यंत तेजस्वी, मेघ व विद्युल्लता यांच्या आकाराचे व महातेजस्वी असे एक कमल आहे. ते रत्नाप्रमाणे तेजस्वी असून विकसित असलेले आहे. त्यामुळे त्याला मणिपद्म असे संबोधतात. ते मणिपद्म नावाचे कमल प्रत्यक्ष विष्णूचे अधिष्ठान असून तेच विष्णुदर्शनास कारण आहे.

त्या मणिपद्माच्या वरील बाजूस आणखी एक कमल आहे. त्याला अनहत या नावाने संबोधले आहे. त्याची कांती

उदयकालच्या सूर्यासारखी असून त्याची बारा दले आहेत.

त्या अनाहत कमलामध्ये हजार सूर्य एकाच वेळी तळपावेत असे तेज असलेले सतेज बाणलिंग आहे. त्याठिकाणी प्रयत्नाशिवाय उत्पन्न होणारे ते ब्रह्मरूप असलेले सहज वेद दिसत असतात. त्या कमलाचे अनाहत हे नाव मुनींनी सांगितले आहे. ते कमलच रुद्राचे अधिष्ठान असलेले श्रेष्ठ असे पद असून आनंदाचे निधान आहे.

त्यावर विशुद्ध नावाचे सोळा पाकळ्या असलेले सुंदर कमल आहे. सोळा स्वरांनी त्या कमलाची सोळा दले तयार केली आहेत. ते कमल धूम्र वर्णाचे असले तरी अत्यंत प्रखर आहे. ते कमल जीवाला परमात्म सुखाचे दर्शन घडवते आणि त्याला अत्यंत शुद्ध करते म्हणून त्या पद्माला विशुद्धपद असे यथार्थ नाव प्राप्त झाले.

त्याच्यावरील भागात आकाश या नावाचे अत्यंत अद्‌भुत असे कमल आहे. तेच कमल आहे. त्याच ठिकाणी सर्व भूत भविष्य, वर्तमान अशा सर्व कालातील आज्ञा उत्पन्न होत असतात, म्हणजे 'आता यानंतर तू अशा मार्गाने जावेस, तुझे वर्तन असे असावे' वगैरे ज्या ईश्वराच्या आज्ञा असतात त्या तेथून सुटलेल्या असतात. म्हणूनच तर त्याला आज्ञाचक्र असे प्राज्ञजन म्हणतात. ते कमल अत्यंत नयन मनोहर असून ह आणि क्ष या दोनच अक्षरांनी युक्त आहे.

हे पर्वतश्रेष्ठा, हजार अरांनी युक्त असलेले जे परमात्म्याचे महनमंगल असे स्थान आहे ते तर सर्वांच्याही वर आहे व श्रेष्ठ आहे असे शास्त्रात सांगितले आहे.

या अभ्यासपूर्ण योगाशिवाय प्राणी जरा, मरण, दुःख इत्यादीपासून आणि संसाररुपी बंधनचक्रातून विमुक्त होत नाही. अशाप्रकारे योग प्राप्त करून घेतलेल्या साधकाचे ठिकाण देवी जगन्मातेचे म्हणजे पर्यायाने माझेच जे जे जसे जसे गुण आहेत तसे ते गुण त्या साधक श्रेष्ठात सत्वर उत्पन्न होतात. हे माझे बोलणे अत्यंत सत्य आहे.

हे , पर्वता, मी दिशा व काल यांनी मर्यादित नाही. म्हणून माझे म्हणजे जगन्मातेचे ठिकाणी आपले चित्त स्थिर करावे. जीव व ब्रह्म यांचे परिपूर्ण ऐक्य आहे असा मनांत विश्वास धरून चिंतन केल्यास साधक सत्वर तद्रूप होतो आणि रागद्वेषाने चित्त मलिन होऊन जर चिंतन केले तर माझी प्राप्ती घडत नाही. अशावेळी साधकाने पुन्हा एकाग्र

होऊ न माझ्या अवयवांशी चित्त स्थिर करून योगाभ्यास करावा.

तेव्हा हे पर्वता, असा हा सांग योगविधी मी तुला आज विस्तारपूर्वक स्पष्टीकरणाने निवेदन केला आहे. केवळ गुरूचा उपदेश झाल्यासच याचे ज्ञान होते. गुरूपदेशाशिवाय कोटि कोटि शास्त्रे अभ्यासून अथवा पठण करूनही हे ज्ञान प्राप्त होणार नाही.

### भक्तियोग व त्याचे श्रेष्ठत्व

आता पराभक्ती म्हणजे काय हे मी तुला सांगते. तू साग्र चित्ताने श्रवण कर. कल्याणकारक व सर्व गुणरत्नांची खाण असलेली मी त्या माझ्यामध्ये नित्य तेलाच्या धारेप्रमाणे चित्ताचे स्थैर्य करून केव्हाही व कोणताही हेतू मनात न धरता नित्य माझ्याच गुणांचे श्रवण करावे व माझ्या नामाचे कीर्तन करावे.

जो केवळ माझी सेवा करणे एवढे एकच कार्य करीत असतो, अन्य काही जाणत नाही, जो शुद्ध सेव्य-सेवक भाव मनात दृढ धरून मोक्षाचीही इच्छा करीत नाही, जो अत्यंत प्रीतीने व निरालस पणे माझे सदैव चिंतन करतो, जो त्याचे व माझेअभिन्नत्व जाणून राहतो जे माझ्याविषयी किंचितही भेदभाव पहात नाही.

सर्व जीवमात्र हे माझेच स्वरूप आहेत अशी ज्याची बुद्धी, स्थिर आहे, जो फक्त अद्वैतच चिंतीत असतो, जसा आपला देह आहे तसाच दुसऱ्याचाही आहे असे जो मनात धरतो व तशीच देहावर प्रीती करतो, जो सर्वप्राणिमात्रात एकसारखे चैतन्य आहे असे मानतो , त्यात द्वैत मानत नाही, सर्वत्र संचार करणाऱ्या आणि सर्व रूपात भरून राहिलेल्या मला जो नेहमी नमस्कार करीत असतो व माझीच पूजा करतो, उत्तम अथवा चांडाल यांमध्येही भेद न बाळगता जो कोठेच मोहबुद्धी ठेवीत नाही आणि भेदशून्य होतो, माझी स्थाने पहाण्याविषयी, माझ्या भक्तांचे दर्शन घेण्याविषयी, तसेच माझेच प्रतिपादन ज्या शास्त्रात सांगितले आहे.

संदर्भ -देवी भागवत स्कंध ७ वा

• • •

# धनत्रयोदशी पूजा, १९ ऑक्टोबर २००६








# दिवाळी पूजा, २१, २२ ऑक्टोबर २००६













## दिवाळी पूजा, २१, २२ ऑक्टोबर २००६









## NITL म्युझिक प्रोग्राम - प्रतिष्ठान, २८ ऑक्टोबर २००६











# आदर्श सहजयोगी होण्यासाठी खालील गोष्टी अंगीकारणे आवश्यक आहे

## आपल्या जीवनांत महत्त्वाच्या गोष्टींचे पूर्णतया अवलंबन करायला हवे

तुमच्या शेजाऱ्यावर स्वत:प्रमाणे प्रेम करा तुमचा शेजारी कोणी सहजयोगी असेल तर त्याच्या बाजूला रहा.आणि तुमच्या आईवर विश्वास ठेवा. जसा मी तुमच्यावर विश्वास ठेवला आहे तसा तुम्ही माझ्यावर ठेवायला हवा; मग सर्व कार्यान्वित होईल. हा विश्वास ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडा. यात मान-सन्मान मिळेल की नाही याची चिंता करू नका. कारण हृदयाला माहिती असते, तुमच्या प्रेमळ हृदयात जो विश्वास असतो तो विश्वास सर्व काही करीत असतो. प्रेमच सर्व अद्ययावतता, सुगंधीपणा देते, प्रेम बोलण्यासाठी नसावे तर खरोखरीच प्रेम आपल्यामध्ये असावे. -

(श्रीमाताजी २१.५.८४)

आई सारखे व्हा; असे कारुण्य तुमच्यामध्धे विकसित होऊ दे की इतरांच्यासाठी तुमच्यामध्धे आईसारखे किंवा पित्यासारखे प्रेम असेल, खरोखरीच इतरांना तुम्ही आईचे प्रेम व कारुण्य द्यायला हवे. स्वत:च्या ऐषआरामाच्या किंवा फायद्यांचा विचार न करता इतरांना आपल्याला कसा ऐषआराम देता येईल याचा विचार करावा.

तुम्हाला मी जे प्रेम व करुणा दिली आहे ती अंतर्यामी साठवून ठेवून दुसऱ्यांना द्यायला हवी. अन्यथा तुम्ही अविकसित रहाल व संपूर्ण संपून जाल. तुमच्यामधील प्रेम व करुणा बाह्यात प्रवाहित व्हायला हव्यात.-

(श्री माताजी २८.७.८५)

## आपल्या बोलण्यात किंवा वागण्यात दुराग्रह (फॅनॅटिकल) असू नये.

आता काही लोकांच्यावर एखाद्या धार्मिक कृत्याचा प्रभाव पडतो. उदा. मी पाहिले आहे की काही सहजयोगी पूजेला येतात, तेव्हा बंधन घेतात, रस्त्यात चालताना बंधन घेतात, कोठेही गेले तरी वेड्यासारखे बंधन घेतात; हे निव्वळ कंडिशनिंग आहे, तारतम्य नव्हे, सहजयोग नव्हे; बंधन घ्यायचे की नाही हे नीट पहायला हवे. आईच्या समोर बंधन असतेच तर मग स्वत:ला बंधन देण्यासारखे त्यात काय आहे? पण, मी बोलत असते त्यावेळीही लोक कुण्डलिनी चढवतात, बंधन घेतात; मला वाटते ते वेडेच आहेत. (श्रीमाताजी १०.७.८८)

तुम्ही पहाल तर अजूनही प्रत्येक धर्मात अनेक कर्मकांडे चालू आहेत. अवतरणांच्या मृत्यूनंतर लोकांनी कर्मकांडांना सुरवात केली. श्रीकृष्णांच्या मृत्यूनंतर लोकांना समजेना की आता काय करावे. कारण कर्मकांडे असू नयेत असे त्यांनी स्पष्ट सांगितले होते.

परिणामत: त्याचा अवतार संपल्यानंतर लोक गंभीर स्वभावाचे झाले आणि धर्मामध्ये गांभीर्याला व कर्मकांडांना सुरवात झाली. लोक अतिशय कर्मकठोर झाले आणि त्याच्याबरोबर जीवनातला आनंद निघून गेला व इतर अनेक गोष्टींची सुरवात झाली. धर्मातील अनेक कर्मकांडाच्या खुळचटपणाला पायबंद घालण्यासाठी श्रीकृष्णांचे आगमन झाले होते त्यांचे अवतरण फार महत्त्वपूर्ण होते. पण किती लोकांना ते समजले आहे हे माहिती नाही. ही सर्व लीला आहे, परमेश्वराचा खेळ आहे, हे दाखवून देण्यासाठी ते आले होते. त्यात गंभीर होण्यासारखे काय आहे? कर्मकांड होण्यासारखे काय आहे? परमात्म्याला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वत:ला कोणत्याही कर्मकांडात बांधून घेऊ नका. - (श्रीमाताजी)

**आपापसातील संबंध विकसित करण्यासाठी कार्यरत असावे, मर्यादांची जाणीव असावी.**

सहजयोग्यांबरोबर तुमचे संबंध आदर्श असावेत. नाहीतर एखादा स्क्रू ढिला असायचा. सर्व संबंध आदर्श करा. समजा एक व्यक्ती अहंकारी आहे, असे तुम्हाला वाटले, त्यावेळी प्रथम तुमच्यांत काही बिघाड आहे का ते पहा; मी परिपूर्ण आहे का? मी व्यवस्थित आहे का?हे पहा.

मी अहंकारी असेन, तर प्रथम मी ठीकझाले पाहिजे. मी अहंकारी नाही आणि म्हणून दुसऱ्यावर प्रभुत्व चालवीत नाही, असे लक्षात आल्यास त्यांच्याशी गोड वागून त्याचा अहंकार खाली आणा, त्यांच्याशी प्रेमाने वागा, म्हणजे त्याचा अहंकार खाली येईल. काहीही करून आदर्श संबंध प्रस्थापित करा. ते अगदी सोपे आहे.

एक-दुसऱ्यांशी परिपूर्ण संबंध असावेत. स्वतःशी मात्र तुमचे संबंध कठोर असावेत. स्वतःला स्पष्टपणे बजावायला हवे की ' मला माझे हे शरीर परमेश्वराला अर्पण करायचे असेल तर स्वतःला परिपूर्ण करायला हवे ' दुसरे म्हणजे दुसऱ्यांशी आदर्श संबंध बनवायलाच हवेत. सहजयोग्याचे दुसऱ्या सहजयोग्याबरोबरचे नाते महान असते. सर्वात मोठे नाते ते आहे तुमच्या बहिणीशी, भावाशी तुमचे संबंध आदर्श असावेत.

**प्रत्येक आठवडयात कमीत कमी एका सार्वजनिक कार्यक्रमात आपण भाग घ्यायला हवा.**

एका बाजूला मला मूर्ख लोक आहेत असे दिसते आणि दुसऱ्या बाजूला अनेक प्रामाणिक साधक आहेत. त्यांच्या पर्यंत कसे पोहचायचे. चिखलाने झाकला गेलेला हिरा असावा असे ते आहेत आणि चिखल तरी किती आहे. चिखलात रुतलेला हिरा बाहेर काढण्यासाठी, अज्ञानाच्या खाणीत खोलवर जावे लागते व त्या ठिकाणी चिखलात हरवलेला हिरा सापडतो. मला अशी काळजी वाटते की हा चिखल त्यांच्या बुद्धीला, त्यांच्या दृष्टीला व जे काही इतर त्यांच्याकडे आहे त्या सर्वांना इतका भरून टाकेल त्यांना कधीच साक्षात्कार मिळणार नाही, ते घालवून बसतील.-

(श्री माताजी १९.१.८४)

सहजयोग जाहिराती देण्याने अथवा माझ्या फोटोने कार्यान्वित होणार नाही. तो कार्यान्वित होणार आहे तुमच्या कार्य करण्याने, जबाबदारी घेण्यामुळे आणि सहजयोगाला उचलून धरण्याने.

**आपल्यामधील कमतरतांच्यासाठी कोणी सबबी सांगू नये.**

तुम्ही चुकीचे काम करता तेव्हा तुमच्यापैकी अनेक जण म्हणतील-माझ्या डाव्या स्वधिष्ठानवर पकड होती-काही म्हणतील -माझ्यात भूत होते-तर आणखी काही दुसऱ्या कशाला तरी दोष देतील.तुम्ही कशालाही दोष द्या, पण कोणी तुम्हाला विचारले आहे? तुम्हीच स्वतःला विचारा, तेव्हा माझी भक्ती म्हणजे स्वतःला सामोरे जाऊन, आपण काय करतो ते स्वतःच पहावे-

(श्री माताजी २८.५.८५)

वर्तमानात रहाण्याचा प्रयत्न करा. वर्तमानापासून पलायन करू नका, वर्तमानाला सामोरे जा. अपराधी वाटून घेऊ नका. अथवा भूताला दोष देऊ नका. दोन्ही तुम्हाला वर्तमानापासून दूर नेतील. संपूर्ण निसर्ग, ईश्वरी शक्ती, कित्येक युगांची तुमची इच्छा- प्रत्येक गोष्ट तुमच्या बाजूला आहे. समय आला आहे, तुम्ही आहात, आपल्याला काय करायचे आहे?हे पहा.

जेव्हा स्वतःस चुकीचे वागताना पहाल तेव्हा स्वतःलाच शिक्षा करा. ईश्वराने तुम्हाला शिक्षा करण्यापेक्षा तुम्हीच स्वतःला शिक्षा करा. कारण ईश्वराची शिक्षा फार कडक असते. परंतु अपराधी वाटून घेऊ नका कारण तुम्ही कोणतीही चूक केली नाही.

(श्रीमाताजी २८.७.८५)

## आपण इतरांबद्दल मतप्रदर्शन करू नये.

माणसाची चांगली बाजू का पाहू नये? वाईट बाजू पाहून ती आपल्याला सुधारता येत असल्यास ठीक आहे. पण त्यांत सुधारणा करणे शक्य नसल्यास तुम्ही स्वत:च वाईट होता. सुधारणा करता आल्यास फारच चांगले.

लोक नेहमी म्हणतात,-मी नसते ते केले- परंतु तुम्ही दुसरे काहीतरी केले जे इतर करणार नाहीत.

दुसऱ्याची परीक्षा करतेवेळी प्रथम स्वत:ची परीक्षा करायला हवी, हे समजले पाहिजे. कशाच्या आधारावर तुम्ही परीक्षा करता? तुमचा अहंकार आणि मन हा दोष सगळीकडे आहे, हे मी पाहिले आहे. येथून पुढे तो अजिबात असू नये. तुम्ही एक दुसऱ्याचे दोष पहाणार नाही तर चांगले गुण पहाणार आहात.- (श्री माताजी २८.७.८५)

जेव्हा सहजयोगीच सहजयोग्यांवर टीका करताना मी पाहते त्यावेळी मला आश्चर्य वाटते, कारण तुम्ही एकाच शरीराचे अंग प्रत्यंग आहात. मी टीका करू शकते ते ठीक आहे. पण तुम्ही का करता? तुम्ही फक्त एक करायचे की एक दुसऱ्यांवर प्रेम करायचे. ख्रिस्तांनी हे तीन वेळा सांगितले, मी आतापर्यंत एकशेआठ वेळा सांगितले आहे, की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. तुमच्यामधील कारुण्य व्यक्त करण्याचा हा एकच मार्ग आहे. मी जर तुम्हाला केव्हातरी प्रेम दिले असेल तर तुम्हाला इतरांबद्दल पेशन्स (धीर)व प्रेम असायला हवे. ( श्री माताजी २८. ७.८५)

दुसऱ्याची परीक्षा करू नका, म्हणजे तुमची परीक्षा होणार नाही, तुम्ही जशी दुसऱ्याची परीक्षा कराल तशीच तुमचीही होईल- (श्री येशू)

इतरांवर सरकॅस्टीक(छद्मीपणाने)मत प्रदर्शन करू नये. हा असाच आहे, तो तसाच आहे, एकमेकांवर असे मत प्रदर्शन करणे मला अजिबात आवडत नाही.तुम्ही सर्वांनी एकमेकांना आदर दिला पाहिजे. एखादी व्यक्ती गर्विष्ठ अथव स्वार्थी असेल तर ते लगेच लक्षात येईल व त्याच्यावर उपाय केले जातील. म्हणून तुम्ही काही मत प्रदर्शन करू नका. सार्वजनिक कार्यक्रमाचे वेळी हे होते असे मी असे ऐकते ते फार वाईट आहे. -(श्री माताजी २४.३.८१)

## आपण निरर्थक गप्पा मारू नये.

काही सहजयोगिनींना सतत बोलण्याची वाईट सवय आहे, त्या सारख्या बोलतच राहतात; हे फार वाईट आहे. त्यांच्यात अद्याप बरेच काही कमी आहे असे दिसते. केवळ साड्या नेसून किंवा कुंकू लावून कोणी सहजयोगी होत नाही. सर्वात प्रथम तुमच्यात गुरुत्व आहे का? आवश्यक असेल तेव्हाच तुम्ही बोलले पाहिजे, काही स्त्रिया सतत बोलत राहतात, काही तरी गोष्टी; भाषण देणार नाहीत. कुरबूर करायची असेल तर तिथे त्या जातील, म्हणून या बाबतीत तुम्ही काळजी घ्यायला हवी. एखादी व्यक्ती टीका करीत असेल तर तुम्ही शांत रहा. ही शांती प्रस्थापित व्हायला हवी. याशिवाय मी पाहिले आहे की माझ्या उपस्थितीतही लोक आपापसात बोलतात, हे फार चूक आहे. दुसऱ्याविषयी चर्चा करण्याचे तुम्हाला कोणतेही कारण नाही. आपण आपल्या एका हाताच्या वागण्याची दुसऱ्या हाताशी चर्चा करतो का? लग्नाचे काय झाले, ह्याचे काय झाले, त्याचे काय झाले; एका दृष्टीने तुम्ही लग्न झालेले लोक नाहींत, तुमचे सहजयोगाशी लग्न झाले आहे-(श्रीमाताजी ८.७.९०)

## आपण वैयक्तिक गोष्टींना सहजयोगाच्या कार्याच्या आड आणू नये

मला आता दिसते आहे की आणखी एका प्रकारची गुलामगिरी आहे. ती म्हणजे स्वार्थीपणाची, आत्मकेंद्रितपणाची मला हा ऐषआराम हवा, मला हे हवे, ते हवे, मला मजा यायला हवी इ. तुम्हाला आनंद व्हायला हवा, नाहींतर याला कांहीं महत्त्व नाही. म्हणजे या सर्वातून तुम्हाला काही तरी वाटायला हवे.

लोक काय करतात ते मला समजतच नाही. कोणत्या प्रकारचे कर्म ते करीत आहेत, जे ध्येय आहे त्या ध्येयाची उंची

त्यांना गांठता येत नाही, त्या पातळीवर त्यांना पोहोचता येत नाही. तुम्हाला काय मिळवायचे आहे? तुम्हाला सर्व जगाला वाचवायचे आहे. म्हणून आता उठा, तुमच्या लहान आणि कमकुवत मनाच्या बाहेर पडा; इतकी उंची गाठा की तिथे तुमच्या लक्षांत येईल की तुम्हाला सर्व मानवतेला वाचवायचे आहे. तुम्हाला जर ते जाणवले नाही तर तुम्ही सहजयोग सोडावा हे बरे. सहजयोग येऱ्या गबाळ्याचे काम नाही. - (श्री माताजी २७.५.८५)

लक्ष्मी सांभाळून ठेवण्याची जबाबदारी आपण घेतली नाही तर भौतिक विश्वात खोलवर शिरणे सहजयोगाला अवघड जाईल कारण आश्रम कोण बांधेल आणि कार्यक्रम कोण घेईल, नेहमी सहजयोगात याना त्या कारणांसाठी पैसे देण्यास सांगितले जाते आणि लोक कुरकुर करतात. परंतु ते लोक केवळ स्थूल अथवा भौतिक स्वरुपाच्या नाटकांकडेच पाहतात. त्याचा सूक्ष्म अर्थ पहात नाहीत. तो म्हणजे लक्ष्मी विष्णू तत्त्वाकडेच लक्ष द्यायचे, त्यामुळे आपल्या आईच्या कृपेने प्राप्त झालेल्या प्रकाशित आत्म्यामुळे संपूर्ण विराटाला प्रकाशित करायचे आहे. सर्व भौतिक प्रकाशित करायला हवे, कारण आपण शुद्ध आत्मा आहोत - (श्रीमाताजी २१.५.८४)

आपल्याला इतके हवे असते पण आपल्या गरजा इतक्या थोड्या असतात.....प्रकाशित व्यक्तीला काहीच आवश्यक नसते. (श्री बुद्ध)

### चैतन्य लहरींचा सतत वापर करावा.

तुम्ही सतत लक्षात ठेवायला हवे की आपण आता साक्षात्कारी जीव आहोत. आपल्याला चैतन्य लहरी प्राप्त झाल्या आहेत. परीक्षा करण्याचा हाच एक मार्ग आहे. याच पद्धतीने समजावून घ्यायचे आहे. दुसऱ्यांना समजू शकण्याचा चैतन्यलहरी हा एकच मार्ग आहे दुसरा कोणताही नाही. तुम्हाल वाटेल व्यक्ती दिसायला चांगली आहे, वागण्यात लाघवी आहे, पण विचारातून कदाचित साप बाहेर येईल.

म्हणून माणसाला पारखण्याचा चैतन्य लहरी हाच एक उत्तम उपाय आहे. तुम्हाला काय समजले किंवा वरवर पारखण्याच्या पध्दती नव्हे, अजूनसुद्धा दुसऱ्याला पारखण्यासाठी आपण अनेक प्रकारे आपल्या मनावर झालेल्या संस्काराचा उपयोग करतो. हे संस्कार आपल्या जजमेंटला, आपल्या पारखण्याला एकांगी स्वरूप देतात. म्हणून चैतन्य लहरीच पाहणे हा उत्तम उपाय आहे. चैतन्य लहरींच्या माध्यमातून काय घडत आहे ह्याचे खरे ज्ञान मिळेल.-

(श्री माताजी १६.५.८७)

बौध्दिक संकल्पनाच्या बाहेर या कारण त्यामुळे तुम्हाला वास्तवाचे ज्ञान होत नाही, जे काही तुमच्याकडे असते ते बौध्दिक स्वरूपाचे ज्ञान असते. खरे ज्ञान तुमच्या अंतर्यामीचा अविभक्त भाग असतो. (श्री माताजी २७.५.८५)

### आश्रमाचे पावित्र्य राखले पाहिजे.

आपण श्री माताजींच्या घरांत राहतो हे कायम लक्षात ठेवावे. आश्रमासंबंधी केव्हाही तक्रारी करू नयेत. आश्रम हे तुमच्या आईचे मंदिर आहे. हे स्थान मंदिरासारखेच असायला हवे. आश्रमवासियांनी आणि बाहेरून येणाऱ्यांनी त्याची काळजी घ्यायला हवी. जरी तुम्ही तुमच्या मुलांना घेऊन आलांत तरी त्यांना प्रत्येक खोलीत जाऊ देऊ नका.

आश्रमात कोणत्याही प्रकारे उपद्रव निर्माण करू नये, आश्रम शांती व आनंदाचे स्थान असायला हवे.

ही वास्तू मंदिरासारखी जतन करायला हवी. येथे रहाणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की ते इथे ट्रेनिंगसाठी राहिले आहेत, याचा सुविधा म्हणून उपयोग करु नये (श्री माताजी २५.३.८१)

## गहनता मिळवण्याचा सतत प्रयत्न करा

सहजयोग हा विषय अंतर्यामी फार खोलवर जायला हवा. कारण सहजयोग जर तुम्हाला समजला असेल- तुम्हाला समजला की नाही अथवा तुम्ही जाणले आहे की नाही हे मला माहीत नाही- तर सहजयोग आपण अनुभवातून शिकतो तुम्ही अनुभव घ्या व मग विश्वास ठेवायचा. मी जे सांगते आहे त्याचा परिणाम तुमच्या मनावर होतो असे नव्हे तर तुम्ही स्वत: अनुभवता व शिकता. (श्रीमाताजी २१.५.८४)

आपली सवय व समय यांच्या बाबतीत आपण उदार असावे. तुम्हाला काय प्राप्त करून घ्यायचे आहे, ते स्पष्टपणे लक्षात घ्या. सहजयोगी म्हणून जीवनात तुम्हाला काय मिळवायचे आहे, ते नीट समजावून घ्या. आता तुम्ही परिवर्तित लोक आहात. जे स्वत:च्या मिळकतीच्याच मागे लागले आहेत, अशा प्रकारचे लोक तुम्ही नव्हेत, तुमच्या वैयक्तिक जीवनाची आरोग्याची, फार काळजी घ्यावी लागते, असेही लोक तुम्ही नव्हेत.तुम्हाला फार करीयरची काळजी असेल माझी नोकरी कशी चांगली राहील इ. तर तुम्ही सहजयोगाच्या बाहेर जावे हे बरे, आम्हाला त्याचा काही उपयोग नाही.

आपण स्वत:शीच भांडू शकत नाही. केवळ सातत्याने सहजयोग साधना करून, जोडेपट्टी करणे, पाण्यात पाय ठेऊन बसणे, ध्यान करणे इ. काळजी घेऊन आत्मा आणि कुण्डलिनी यांच्यावर सर्व काही सोपवायचे. ते आपल्यासाठी सर्व कांही घडवून आणतात. शिवाय, सर्व काही आपोआप होत असल्याने, अहंकार निर्माण होण्यास अथवा बौध्दिक कार्यास वाव राहू नये.- (श्रीमाताजी २१.५.८४)

काही लोकांच्या मनात - माझी प्रिय माणसे, माझी बायको हे, ते वगेरे सतत घोटाळत असते. तुम्ही येथे का आलात कशा करता आलात? तुम्ही या सर्वांच्यावर उठू शकत नसाल, तर मला तुम्ही मदत करू शकत नाही. तुम्ही कणखर लोक व्हायला हवे. तुम्ही पराक्रमी, ध्येयवादी आणि उदात्त विचाराचे असे लोक व्हायला हवे.-

(श्री माताजी २८.७.८५)

तुमची आई बोलण्यात पारंगत आहे आणि ती तुमच्याशी बोलते, परंतु या सर्वांना तुम्ही बुद्धीने चिकटून बसू नका. उदा. श्री माताजी असे म्हणाल्या, सर्व जण उत्साहाने चर्चा करतात हे होते, ते होते; परंतु माझे बोलणे तुमच्या अंतरंगाचा अविभक्त भाग होऊन राहात नाही, सगळ्या लोकांना सगळी माहिती असते परंतु अंतर्यामी काहीच नसते.

माझी मुले असणे सोपे नाही, कारण तुम्ही काय करता हे मला समजते. तुमची प्रत्येक गोष्ट मला माहीत असते. मी तुम्हाला सुधारत असते ते तुम्ही जाणताच, परंतु जेव्हा तुम्ही मला धरून राहता तेव्हा असे दिसते की ज्यांनी उन्नत होण्याचा निश्चय केला आहे आणि आपल्या अंतर्यामी परिवर्तन करून अधिक चांगल्या स्थितीमध्ये उत्क्रांत होण्यात प्रयत्नशील असणाऱ्यापैकी तुम्ही आहात. सहजयोगी असणे सोपे नव्हे, की तुम्ही पैसे दिलेत आणि सदस्य झालात आणि माताजींचे शिष्य झालांत. माझे शिष्य झाल्यावरही तुम्हाला काही परीक्षांमध्ये उतरावे लागते आणि त्यासाठी मेहनत करावी लागते. तुमच्या कुटुंबामध्येच राहून पुष्कळ तपस्या करावी लागते.

• • •

# श्रीमाताजींचे मार्गदर्शन

## चैतन्यलहरी आणि आत्मविश्वास

(निर्मल योग १९८३)

आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर चैतन्य लहरींची जाणीव ही अत्यंत दुर्मीळ अशी देणगी दिलेली आहे. आपले निर्णयाचे क्षेत्र विस्तृत होऊन आपल्यापुढे अपार क्षितिजे होतात. आपली 'नीर-क्षीर' न्यायवृत्ती प्रगल्भित होते व निर्णयाबद्दल आपला विश्वास वाढतो. आपण अंध:कारातून प्रकाशाकडे येतो व अनिश्चिततेपासून निश्चितता लाभते. चैतन्य लहरींमुळेच योग्य व रास्त मार्गाचे अवलोकन होते.

परंतु ह्या शक्तीचा दुरुपयोग केला तर ती (आपणास मिळालेली शक्ती)लुप्त पावते. त्यामुळे आपण आपला आत्मविश्वास गमवतो व पर्यायाने सहजयोगावर ठपका ठेवतो.

ही शक्ती जर आपण अंत:करणापासून वापरली तर तिचे उत्तर आपणास मिळते कारण तिचा उगम परमेश्वरी शक्तीशी असतो.

या घटनेमुळे निर्णय घेण्याची वृत्ती व आत्मबल यावर व्यक्तीचा आत्मविश्वास दृढावतो. एखादी घटना घडल्यावर कारण शोधणे व निर्णय घेणे व तो अमलात आणणे यांच्या अंतिम वेळी आपल्या निर्णयावर आपला विश्वास नसल्यामुळे आपण कच खातो. आपला आत्मविश्वास गमावल्यामुळे आनंद मावळतो. कारण ही कृती व दैवी शक्ती याचा संबंध नसतो.

तथापि आपले चित्त श्री माताजींच्या चरणी ठेवल्यास आपणास त्या शक्तीची जाणीव होईल. उदा. लहान पाखरासारखी आपली अवस्था आहे. ते उडण्याचा प्रयत्न करते पण आत्मविश्वास नसल्यामुळे ते परत घरटी येते. अंतिमत: प.पू.श्री माताजींच्या कृपेने स्वत: आकाशात भरारी मारण्यासाठी समर्थ होते.

अशाच प्रकारे आपण प.पू.श्रीमाताजींच्या प्रेमळ संगोपन, सुज्ञ मार्गदर्शन अपार करुणेच्या जोरावर भरारी मारण्यास समर्थ होतो. आपण बलवान होऊन सत्याला सामोरे जाऊ शकतो.

## सहजयोग्यांचे आचरण

प.पू.माताजी श्री निर्मलादेवींचा उपदेश (निर्मल योग १९८२)

१ सहजयोग्याला आत्मसाक्षात्कार झाल्यावर त्याला निरंतर प.पू.श्रीमाताजींच्या बंधनात रहावे लागते.साधकाला सहजानंद मिळत असल्यामुळे त्यापासून अलिप्त राहू शकत नाही. कारण ते कायम त्याच्या अंतरंगात वास करीत असते.

२ सहजयोग्याने नेहमी वर्तमानकाळात रहावयास हवे. त्याने प.पू.श्रीमाताजींना तर्काने वा बुद्धीने जाणण्याचा प्रयत्न करु नये. कारण त्या बुद्धीच्या पलीकडील आहेत.

३ साधकाने स्वत:च्या समस्या, दोष वा उणीवा कोणत्या आहेत त्या जाणून घ्याव्या. आपल्यासमोरील ह्या सर्पांना वा विंचवांना थारा देऊ नये. स्वत: शुद्ध व्हा. आता सत्याचा प्रकाश आपल्यावर झळकत आहे. आपण त्याचा फायदा घ्यावा व 'आत्म-तत्त्वाची'ओळख करून घ्यावी. त्यामुळे तुम्ही वरच्या गोष्टींना सामोरे जाऊ शकाल. त्या गोष्टी आहेत म्हणून त्यांचे समर्थन करू नका.

४ जे सहजयोगाबद्दल सकारात्मक भूमिका घेतात त्यांच्याशीच संबंध ठेवा व नकारात्मक विचार करू नका. असे केल्याने वैयक्तिकरित्या सहजयोगाची उंची वाढण्याच बरे पडेल.

५ साधकाचा उत्साह व आत्मविश्वास त्याच्या अंतरंगात असतो. त्याला चक्रांची, कुंडलिनीची संपूर्ण माहिती असते व त्यांनी स्वत:च्या पुढाकाराने वरील कार्य करावे.

६ सहजयोग्याने एकमेकांशी आपुलकीने वागावे. कोणावरही राग करू नये. रागामुळे माणसे तोडली जातात.आपण आपल्या भाषेत गोडवा व संयम राखावा. आपण दुसऱ्याचे रक्षण केले पाहिजे व आपल्या वागणुकीमुळे त्याला तोडता उपयोगी नाही.

७ सहजयोग्याने अंतर्मुख व्हावयास हवे. मी सहजयोगांत कां आलो? मला कोणता फायदा मिळाला? वा मिळणार आहे? आपले कुठे चुकले? आपण पुढे काय करावयास हवे? आपण साधारणपणे कोठे चुकतो? आपल्या उन्नतीसाठी आपण कोणता त्याग केला? हे त्यांनी स्वत: न्याहाळावे सर्वसाधारण असे दिसते, की साधक हा बहिरंगावर विचार करण्यास जास्त प्रवृत्त असतो. परंतु त्याने असा विचार करावा की आपण परमेश्वराविषयी 'प्रेम व श्रद्धा' किती बाळगतो? थोडक्यात सहजयोगी हा पारदर्शक असावा. त्यातच त्याची उन्नती आहे.

## प.पू.श्रीमाताजी श्री निर्मलादेवींचा उपदेश

(निर्मलयोग १९८३ व खं. ३-१५ पा. १४-१५)

१ सहजयोग्यांना आपण चैतन्यमय आहोत याची जाणिव हवी. आपण जन्मल्यानंतर फक्त सुख साधनेचाच विचार करतो. आपले वास्तव्य व कर्तव्य काय आहे ह्या विषयातच मशगुल असतो. परंतु हा दृष्टीकोन सोडून चैतन्याबद्दल जेव्हा विचार करू लागतो तेव्हा त्या जड वस्तू सुद्धा चैतन्यमय होतील असे वातावरण आपण तयार केले पाहिजे.

ही गोष्ट समजणे अत्यंत कठीण आहे व थोडेच लोक जाणू शकतात. उदा. माझ्याकडे गणेशाचा फोटो दाखवून मी याची पूजा करू शकतो का? अशी विचारणा करण्यात येते. प्रथम आपण त्यापासून चैतन्य-लहरी येतात का नाही? हे तपासून पहावे.दुसरे उदा. समजा तुम्हाला नवीन घर घ्यावयाचे आहे, त्यावेळी त्या वास्तू पासून चैतन्य येते किंवा नाही? याचा तपास घ्यावा. आपण दुसऱ्या गोष्टी म्हणजे आराम, सुख व आवडी-निवडीचा विचार करतो. परंतु त्याच्या चैतन्याकडे आकृष्ट व्हावयास हवे. म्हणजे जड वस्तुमध्येदेखील चैतन्याचा अंश असतो हे आपणास कळून येईल.

एकदा या चैतन्य शक्तीची जाणीव झाली म्हणजे ते आपल्या अंतरंगात कार्य करू शकते व आपण आपली प्रकृती,मन,अहंकार, प्रति अहंकार आणि प्रत्येक गोष्ट आत्मप्रकाशात उजळून आत्मिक बळावर ती पाहू शकतो.

२ प्रथम नकारात्मक गोष्टीचा प्रभाव डव्या बाजूच्या स्वाधिष्ठान चक्रावर दिसून येतो. कारण तेच कुंडलिनीच्या स्थानानंतरचे चक्र आहे. वस्तुत: डावे स्वाधिष्ठान चक्र हे गणेशाचा अंकीत आहे. गणेश ही देवता जन्म-मृत्यूच्या फेऱ्यावर लक्ष ठेवते. म्हणूनच गणेशजी आपली संतुलनता व विवेक यांचा नाश होऊ देत नाही. परंतु ही नकारात्मक भूमिका आपल्या चुकीच्या इच्छेनुसार, जडवस्तुंच्या अभिलाषेतूनही येऊ शकते. म्हणून आपण त्यापासून दूर राहिलेले बरे. याला उपाय म्हणजे आपण आपल्या गरजा सीमित ठेवाव्या. त्यामुळे आपण त्यांच्या आहारी न जाता सुखी जीवन जगू शकतो. कारण आपण भूत व भविष्य काळातील विचार सोडून देतो व आपण आपल्या डाव्या मणीपूर चक्रातून ह्या जड वस्तूंचा जो हव्यास सुरू होतो तोच आपण थांबवतो. कारण 'काळ'ही जड वस्तू आहे व आपण तिचा विचारच सोडून देतो.

३ आपले सगळे लक्ष आत्म्यावर केंद्रीत केले की, डाव्या नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो. आपला आत्मा आनंदीत असेल तरच आपल्यातून चैतन्य वाहू लागेल. आपले चित्त जड वस्तूपासून दूर नेल्यास आपल्याला डाव्या नकारापासून संरक्षण मिळेल. आपण नेहमी आपली दृष्टी मध्यातूनच ठेवावी म्हणजे आपणास नको असलेले दिसणार नाही व प्रयत्नही करणार नाही.

४ सहजयोगात काही गोष्टी निषिद्ध मानलेल्या आहेत. उदा. आपण कोणाचेही पाय धरू नये. तसेच सहजयोग्याने देखील कोणालाही पाय धरू देऊ नये. हे सहजयोग्यांचे मोठे बंधन आहे असे मानावे. जे कोणी पाय शिवतील त्यांचे चैतन्य नाहीसे होईल वा जो पाय शिवून घेतील त्यांना देखील हृदय चक्रावर पकड येईल.

आपल्या सर्वांचा सारखाच उद्धार होत असतो. आपण एका व्यक्तीचेच अंग व प्रत्यंग आहोत. ह्यांत उच्च नीचतेचा भाव येतच नाही. एखाद्याला असे वाटते, की हा भाव लवकर कमी होईल. पण तसे न होता ही डावीकडची बंधनाची भावना आहे. म्हणून प्रत्येकाने प्रगल्भ इच्छा बाळगावी,की आपल्या सर्वांना आत्मसाक्षात्कार व्हावा. आपण जेव्हढ्यांना पार करता येईल त्यांना पार करावे. आपली स्वत:ची जेवढी शक्यता असेल तेवढी प्रगती करून घ्यावी व आपण अनंत आशीर्वादाला पात्र व्हावे.

५ विचार डाव्याबाजूने सुद्धा येऊ शकतो. जर भुताची बाधा तुमच्या डोक्यात असेल तर ते असे विचार देऊ शकतील 'तू तर नालायक तुझा काही उपयोग नाही' अशा वेळी आपण आपली उजवी बाजू उचलून डावीकडे बंधन द्यावे. हे आपण असे का करतो? कारण उजव्या बाजूने आपणास आशीर्वाद मिळतात ते आपण डावीकडे पाठवतो. ज्या लोकांना डावीकडील बाधा असते असा हा प्रकार करावा म्हणजे त्यांचे त्याबद्दल विचार येणार नाहीत. अशावेळी आपले नांव जमिनीवर काढून त्याला बंधने देऊन ' आपण जोडे पट्टी करणे चांगले आपण आनंदात राहून परमेश्वराचे चांगले ध्यान करावे व परमेश्वरास सांगावे की, मी आनंदी आहे. कारण मला पाहिजे ते मिळाले आहे.

उजव्या बाजूलादेखील स्वाधिष्ठान चक्रावर पकड येऊ शकते. कारण आपण विचार करतो. त्यामुळे त्या चक्रावर पकड येते. विचार मग तो डाव्या वा उजव्या बाजूचा असला तर तो तुमच्या लिव्हरवर परिणाम करू शकतो व दोन्हीकडून आल्यास त्याचा परिणाम फार तीव्रतेने जाणवतो.

६ म्हणून सहजयोग्याने नेहमी सतर्क रहावयास हवे. आपण आपला तोल घालवता कामा नये. दोन्ही बाजूकडे न धावता आपण मध्यातच रहाणे म्हणजे आपण 'निरीच्छ'भावनेत असतो. एखाद्या बाबीत विरून जाणे वा त्याची माहिती घेणे यात फरक आहे. म्हणून आपण आपल्यालाच सांभाळून घेतले पाहिजे. चैतन्याला या सर्व गोष्टींची जाण असते. म्हणून तुम्हाला त्याचे जर ज्ञान झाले तर आपण एक चांगले सहजयोगी झालात असे समजावे.

७ जर हृदय चक्रावर बाधा असेल तर त्या इसमाची प्रगती खुंटते. हृदय हे प्रकाशाचे उगमस्थान आहे. तेथूनच ब्रह्मशक्ती निर्माण होते व तेथेच आत्मा वास करतो. आपल्या हृदयात जर चैतन्य नसेल तर आपण आपली प्रगती कशी करू शकाल?

आपण काय निवडायचे याचे ज्ञान आपणास हवे. सहजयोगामुळे ते साध्य होऊ शकते व आपणास तेथेच परिपकता येते. हीच सहजयोगातील आपली उन्नती. आपण आता दुसऱ्या कोणालाही त्याबद्दल न विचारलेले बरे.

हा उन्नतीचा मार्ग आपण स्वीकारावा व आपणास त्याचे संपूर्ण ज्ञान हवे म्हणजेच आपणास खरे काय ते कळेल व मला सुधारून कसे घेता येईल. मला 'मी' म्हणजे काय ते कळावयास हवे. तो म्हणजे माझा 'आत्मा' आहे. माझा 'अहंकार' नव्हे. तदनंतर अहंकार व प्रति अहंकाराला थाराच मिळत नाही व आत्माच त्याला ज्ञान देऊ शकतो.

९ परमेश्वर आनंद उपभोगत असतो आपण नसतो. आपण त्याच्या चरणी लीन व्हावे व आपण नेहमी म्हणत रहावे, की परमेश्वराने मला निर्माण केले हाच माझा खरा मोठा आनंद आहे. त्याने आपणास चैतन्यमय जीवन प्रदान केले आहे व त्यामुळेच आपणास त्याच्या प्रेमाची प्रचीती येते व त्यांनी आपणाकरीता किती कष्ट सोसले ते व आपणास ह्या स्थितीत आणून ठेवले ते ही कळून येते.

परमेश्वराने जे तुला दिले ते तू दुसऱ्याला दे व त्यातच आनंद मान व त्यांचे जीवन सुखमय कर व असे जर केले तर तुझ्या दोन्ही बाजूची पकड एकदम सुटेल व तू चैतन्यमय होशील.

● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

# प्रतिष्ठान आगमन, १७ ऑक्टोबर २००६











# दिवाळी पूजा, २००६















